# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## प्रधानमंत्री आवास योजना ( शहरी )

# माहिती पुस्तिका - २०२६

**सन : २०२६**

**प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ अंतर्गत परवडणाऱ्या घरांची निर्मिती**

**१८३६ सदनिकांची टप्पे निहाय सोडत अंतर्गत ३०५ सदनिकांची संगणकीय सोडत**



कुळगांव बदलापूर नगरपरिषद, नवीन प्रशासकीय इमारत, बांधकाम विभाग, PMAY कक्ष, तिसरा मजला, बदलापूर (पु)


# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

म्हाडा MHADA

प्रधान मंत्री आवास योजना-शहरी



**श्री. नरेंद्र दामोदरदास मोदी**
(मा. पंतप्रधान)



**श्री. जिष्णू देव वर्मा**
(मा. राज्यपाल)



**श्री. देवेंद्र फडणवीस**
(मा. मुख्यमंत्री)



**श्री. एकनाथ शिंदे**
(मा. उपमुख्यमंत्री)



**सौ. सुनेत्रा अजित पवार**
(मा. उपमुख्यमंत्री)



**डॉ. पंकज कांचन राजेश भोयर**
(मा. राज्यमंत्री - गृहनिर्माण)



**श्री. के. एच. गोविंदराज**
(मा. अतिरिक्त मुख्य सचिव, नगरविकास-2)



**श्री. असीम कुमार गुप्ता**
(मा. अतिरिक्त मुख्य सचिव, गृहनिर्माण व नगर विकास)



**श्री. संजीव जयस्वाल**
(मा. उपाध्यक्ष - म्हाडा)



**सौ. रुचिता राजेंद्र घोरपडे**
(मा. नगराध्यक्षा)



**सौ. प्रियांका आशिष दामले**
(मा. उपनगराध्यक्षा)



**श्री. रमेश जनार्दन सोळसे**
(मा. बांधकाम सभापती)



**श्री. मारुती गायकवाड**
(मुख्याधिकारी)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | मनोगत | ४ |
| २ | संगणकिय सोडत मे २०२६ चे वेळापत्रक | ५ |
| ३ | विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशील | ६ |
| ४ | पात्रतेच्या अटी व शर्ती | ७ |
| ५ | सदनिकांच्या संगणकिकृत अर्ज भरण्याची कार्यपद्धती | ९ |
| ६ | सदनिकांच्या संगणकिकृत सोडतीची कार्यप्रणाली | १२ |
| ७ | सदनिकांची विक्री किंमत भरणा करावयाच्या अटी व शर्ती | १४ |
| ८ | विशेष अटी व शर्ती | १७ |
| ९ | Software बाबत माहिती | १९ |
| १० | विशेष सूचना | २१ |
| ११ | संपर्क क्रमांक | २२ |

# मनोगत

कुळगाव बदलापूर नगरपरिषद (KBMC) ही महाराष्ट्रातील ऐतीहासिक व सांस्कृतीकदृष्टया समृध्द शहर कुळगाव बदलापूरच्या प्रशासन व विकासासाठी जबाबदार असलेली प्रशासकीय संस्था आहे. मा. प्रधानमंत्री महोदय श्री.नरेंद्र मोदी यांच्या "सर्वांसाठी घरे" या संकल्पनेनुसार तसेच मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार कुळगाव बदलापूर नगरपरिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत १८३६ कुटुंबीयांना हक्काचे घर उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच सर्वसामान्य जनतेचे घराचे स्वप्न साकारण्यासाठी कुळगाव बदलापूर नगरपरिषदची ऑनलाईन टप्पेनिहाय सोडत प्रसिध्द करतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

माहे मे-२०२६ मध्ये कुळगाव बदलापूर नगरपरिषदची ऑनलाईन टप्पेनिहाय सोडतीची जाहिरात प्रसिध्द करण्यात येत असुन त्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) १८३६ सदनिकांच्या टप्पेनिहाय संगणकीय सोडतीसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशनचा शुभारंभ नविन सॉफ्टवेअर प्रणाली ALMS 1.0 नुसार होणार आहे. ALMS 1.0 या नविन सॉफ्टवेअर प्रणालीमुळे नागरिकांना घरबसल्या वेबसाईट किंवा मोबाईल ॲपच्या माध्यमातुन रजिस्ट्रेशन करणे, अर्ज भरणे व ऑनलाईन पेमेंट या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

सदर ऑनलाईन टप्पेनिहाय सोडत संपुर्णपणे पारदर्शी असुन कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने कोणत्याही एजंटची नेमणुक केलेली नाही. संगणकीय सोडतीमध्ये कोणताही मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही, त्यामुळे अर्जदारांना असे आश्वासित करण्यात येते की, सर्व प्रक्रिया ऑनलाईन स्वरुपाची असुन अर्जदारांनी सदर ऑनलाईन टप्पेनिहाय सोडतीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा हि विनंती.

स्थळ :- कुळगाव-बदलापूर

मा.मुख्याधिकारी
कुळगाव-बदलापूर नगरपरिषद

कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## सोडतीचे वेळापत्रक

# कुळगांव बदलापुर नगरपरिषद, कुळगांव

### प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सदनिकांच्या ऑनलाईन संगणकीय सोडत मे -२०२६ चे वेळापत्रक

| अ.क्र | टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| २ | सोडतीसाठी ऑनलाईन अर्जाची स्वीकृती सुरुवात | दि.०१/०५/२०२६ | दुपारी १२.०० वाजेपासून |
| ३ | सोडतीसाठी ऑनलाईन अर्जच्या पेमेंट स्वीकृतीची सुरवात | दि.०१/०५/२०२६ | दुपारी १२.०० वाजेपासून |
| ४ | सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ | दि.३१/०५/२०२६ | रात्री ११:५९ वाजेपर्यंत |
| ५ | ऑनलाईन पेमेंट स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दि.०१/०६/२०२६ | रात्री ११:५९ वाजेपर्यंत |
| ६ | सोडतीसाठी स्विकृत अर्जांच्या प्रारुप यादीची प्रसिध्दी दिनांक व वेळ | दि.१७/०६/२०२६ | दुपारी १२:०० वाजता |
| ७ | प्रारूप यादी प्रसिध्द झाल्यापासुन ऑनलाईन आक्षेप/ दावे-हरकती दाखल करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.२५/०६/२०२६ | सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत |
| ८ | सोडतीसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांची अंतिम यादीची प्रसिध्दी दिनांक व वेळ | दि.०३/०७/२०२६ | दुपारी १२:०० वाजता |
| ९ | देखरेख समिती (OSC) च्या देखरेखी मध्ये DRY RUN | दि.०६/०७/२०२६ | |
| १० | सोडतीचा दिनांक व वेळ | दि.०८/०७/२०२६ | दुपारी १२:०० वाजता |
| ११ | सोडतीचे स्थळ | कु.ब.न.प. कार्यालय | |
| १२ | सोडतीमधील यशस्वी व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची नावे कु.ब.न.प.च्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.०८/०७/२०२६ | |

**टिप: सोडत प्रक्रिया वेळापत्रकात तसेच इतर बाबत काही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती ही वेब प्रणाली वर स्वतंत्ररित्या प्रसिद्ध करण्यात येईल.**

# विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांचा तपशील

| अ. क्र. | योजनेचा संकेत क्र. | योजनेचे नाव | उत्पन्न गट | विक्रीसाठी टप्पेनिहाय उपलब्ध करावयाच्या एकूण सदनिका (AHP अंतर्गत १८३६ सदनिकांची टप्पेनिहाय सोडत) | सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (चौ.मी.) | सदनिकेची विक्री किंमत | अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम व अर्ज शुल्क रु.५००/- + जीएसटी @ १८% रु.९०/- = एकूण रु.५९०/- | रेरा नोंदणी क्रमांकची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | KBMCT4AHP305-BADLAPUR | प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) | EWS | इमारत क्र.४-३०५ | २९.०३ | २०,००,०००/- | ५००० + ५९० = ५५९०/- | P51700048693 |
| | KBMCT1AHP309-BADLAPUR | | | इमारत क्र.१-३०९ | | | | |
| | KBMCT2AHP309-BADLAPUR | | | इमारत क्र.२-३०९ | | | | |
| | KBMCT3AHP304-BADLAPUR | | | इमारत क्र.३-३०४ | | | | |
| | KBMCT5AHP304-BADLAPUR | | | इमारत क्र.५-३०४ | | | | |
| | KBMCT6AHP305-BADLAPUR | | | इमारत क्र.६-३०५ | | | | |

**टीप: मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडील दि.०४/०२/२०२६ रोजीचे स्वाक्षरी नुसार आरक्षण विषयक परिपत्रकाचे अनुपालन करून कुठल्याही प्रकारचे सामाजिक/जात/प्रवर्ग निहाय आरक्षण न ठेवता सर्वसाधारण प्रवर्ग (General Public) करिता खुले ठेवणे नियोजित आहे.**

# पात्रतेच्या अटी व शर्ती

१. अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

२. अर्जदार किंवा त्यांची पत्नी / पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावावर भारतात कुठेही पक्के घर नसावे.

३. अर्जदाराने जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून मागील सलग २० वर्षाच्या कालावधीत भारत देशाच्या कोणत्याही भागामध्ये अर्जदाराचे किमान ०३ वर्षे सलग वास्तव्य असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले भारत देशातील अधिवासाचे प्रमाणपत्र (Certificate of Age, Nationality and Domicile), मतदान कार्ड, पासपोर्ट, शाळा सोडल्याचा दाखला, वाहन परवाना ई. ग्राह्य ठरला जाईल / Capture केला जाईल.

४. दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ अथवा दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ या कालावधीतील अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न विविध उत्पन्न गटासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे असावे. "कौटुंबिक वार्षिक उत्पन्न" म्हणजे अर्जदाराचे स्वतःचे एकट्याचे व त्यांची पत्नी / पती यांची मासिक प्राप्ती असल्यास दोघांचे मिळून नोकरीद्वारे अथवा उद्योग व्यवसायापासून जीवितार्थाचे सर्वसाधारण साधन म्हणून दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ अथवा दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ या कालावधीत झालेल्या उत्पन्नाच्या प्राप्तीवरुन आयकर विवरण पत्र अथवा तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला उत्पन्न स्रोत म्हणून संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य ठरला जाईल. दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ अथवा दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ (Assessment Year:२०२४-२५/२०२५-२६) मधील आयकर विवरण पत्र अथवा तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरुपाचा उत्पन्न स्तोत्राबाबतची कागदपत्रे / दाखले / पुरावे / प्रतिज्ञापत्र / वेतन प्रमाणपत्र इ. संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य धरली जाणार नाही / Capture केली जाणार नाही, संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरताना विशेष नोंद घ्यावी तसेच कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला हा अर्जदाराच्या नावे असणे बंधनकारक आहे.

## उत्पन्न मर्यादा

कुळगाव बदलापुर नगरपरिषदे अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेकरिता अर्जदाराचे दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ अथवा दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ (Assessment Year:२०२४-२५/ २०२५-२६) मधील आयकर विवरण पत्र अथवा तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखल्यामधील कौटुंबिक उत्पन्न हे शासन निर्णय क्र.प्रआयो-२०१९/प्र.क्र.१२६/गृनिधो-२, दि.२५/०५/२०२२ अन्वये अत्यल्प उत्पन्न गट (EWS) या प्रवर्गाकरिता अनुज्ञेय चटई क्षेत्रफळ व उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उत्पन्न गट | सुधारित कमाल उत्पन्न मर्यादा (रूपये वार्षिक) | | |
|---|---|---|---|---|
| | | मुंबई महानगर क्षेत्र, पूणे महानगर क्षेत्र, नागपूर महानगर क्षेत्र, नागपूर सुधार प्रन्यास प्रदेश तसेच १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र | उर्वरित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र | अनुज्ञेय क्षेत्रफळ Carpet Area |
| १ | अत्यल्प उत्पन्न गट (EWS) | ₹ ६,००,०००/- पर्यंत | ₹४,५०,०००/- पर्यंत | ३० चौ.मी. पर्यंत |

द नॅशनल ट्रस्ट फॉर द वेल्फेअर फॉर पर्सन्स विथ ऑटिस्म, सिरेब्रल पालसी, मेन्टल रिटार्डेशन ॲन्ड डिसॅबिलिटिज, ॲक्ट १९९९ मधील प्रकरण ६ मधील कलम १३ ते १७ मधील तरतूदींच्या अधीन राहून गतीमंद (Mental Retarded) व मनोविकृत (Mental Illness) अर्जदारांच्या वतीने संबंधीत व्यक्ती / संस्था अर्ज करु शकतील व या स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या व्यक्तीस सदनिकेचे वितरण करताना त्याचे वैयक्तिक उत्पन्न किंवा पालकाचे उत्पन्न विचारात घेण्यात येईल. अर्जदाराचे संगणकीय प्रणालीअंतर्गत UDID Card (Unique Disability Indentity) ग्राह्य ठरली जाईल / Capture केली जाईल, याव्यतिरिक्त अन्य कोणताही पुरावा संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य ठरला जाणार नाही / Capture केला जाणार नाही, याची कृपया संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरताना विशेष नोंद घ्यावी.

सदर प्रकल्पा अंतर्गत सोडत प्रक्रीयेनुसार यशस्वी झालेल्या लाभार्थ्यांनी टप्पेनिहाय रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक राहील. नगरपरिषदे मार्फत आकारण्यात येणारे सर्व कर हे नगरपरिषदेकडे भरावे. तसेच, पाणीपट्टी, मल: निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थ्यांना / सहकारी गृहनिर्माण संस्थेस / त्या त्या प्राधिकरणाकडे परस्पर भरावे लागतील.

**समर्पित झालेल्या सदनिकांच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही :**

अर्जदाराने देकारपत्र निर्गमित करण्यापुर्वी स्वेच्छेने सदनिका समर्पित केल्यास अनामत रक्कमेतून रु.१०००/- प्रशासकीय शुल्क वजा करुन उर्वरित रक्कम अर्जदाराच्या बँक खात्यात विना व्याज परतावा केली जाईल. देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव सदनिकेचे वितरण रद्द करण्यात आल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल. सद्यस्थितीत देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने स्वेच्छेने सदनिका सर्पित केल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल. सदर प्रकरणी मा.मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

## सदनिकांसाठी संगणकीकृत अर्ज भरण्याची कार्यपद्धती

- ऑनलाईन नाव नोंदणीकरिता https://www.kbmc.pmayhome.com/ या संकेतस्थळावर व कुळगाव बदलापुर नगरपरिषदेच्या https://kbmc.gov.in/ या संकेतस्थळावर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अर्जदाराने सर्व प्रथम स्वतःची नाव नोंदणी करावी व सर्व माहिती काळजीपूर्वक भरावी. ऑनलाईन नोंदणी, अर्ज शुल्क, अनामत भरणा हा विहीत वेळेत व कालावधीत वेळापत्रकामध्ये नमुद तपशीलानुसार काळजीपूर्वक माहीती भरावी.
- नाव नोंदणीसाठी अर्जदाराने, अर्जामध्ये विहीत केलेली माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच * अशी खुण असलेली माहिती भरणे बंधनकारक आहे.
- **अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करणेपूर्वी खालील माहिती सोबत ठेवावी, म्हणजे अर्ज भरणे सुलभ जाईल.**

१) अर्जदाराचा स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई-मेल आयडी तसेच मोबाईल नंबर आधारकार्डशी लिंक असणे बंधनकारक आहे.

२) ओळखपत्राकरिता स्वतःचे आधारकार्ड आणि विवाहित असल्यास पती व पत्नी या दोघांचे आधारकार्ड देणे बंधनकारक आहे.

३) स्वाक्षरीचा नमुना व जन्मतारखेकरिता - स्वत:चे पॅन कार्ड आणि विवाहित असल्यास पती व पत्नी या दोघांचे पॅनकार्ड देणे बंधनकारक आहे.

४) अर्जदार सध्या वास्तव्यास असलेल्या घराचा संपूर्ण पत्ता व पोस्टाचा पिन कोड क्रमांक सुस्पष्टपणे नोंदणी करुन खात्री करणे आवश्यक आहे, जेणेकरुन पुढील पत्रव्यवहार हा अर्जदारास योग्य पत्यावर प्राप्त होईल.

५) अर्जदाराचे भारतातील वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Certificate of Age, Nationality and Domicile).

६) उत्पन्नाच्या स्तोत्राकरिता पात्र उत्पन्न गटानुसार अर्जदाराचे दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ अथवा दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ (Assessment Year – २०२४-२५/२०२५-२६) मधील आयकर विवरण पत्र अथवा तहसिलदाराचा उत्पन्नाच्या दाखल्यामधील कौटुंबिक उत्पन्न याबाबत तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला संगणकीय प्रणालीव्दारे ग्राह्य / Capture केले जाईल.

७) जात प्रमाणपत्र

८) अर्जदाराच्या बँक खात्याचा तपशिलामध्ये बँकेचे नाव, बँकेची शाखा, खाते क्रमांक, आयएफएससी कोड, एमआयसीआर क्रमांक योग्य असल्याची व सदर बँक खाते बंद नसल्याची खात्री करणे आवश्यक आहे. जेणेकरुन अनामत रक्कम भरणा व परतावा करणे सोयीचे होईल. चुकीचे बँक तपशिल दिल्यावर अनामत रक्कम परतावा मध्ये अडचणी उद्धवल्यास म्हाडा जबाबदार राहणार नाही (चुकीचे बँकेचे तपशील दिल्यावर अयशस्वी अर्जदाराचे अनामत रक्कम परतावा मध्ये विलंब होऊ शकतो). अर्जदाराच्या स्वतःच्या बचत खात्याचा तपशील जसे, बँकेचे नाव, शाखा व पत्ता, खाते क्रमांक, बँकेचा MICR/IFSC क्रमांक द्यावा. अर्जदारास दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशिल देऊन अर्ज करता येणार नाही. तसेच

चालु खाते, संयुक्त खाते, एन.आर.आय. खात्याचा तपशील चालणार नाही असे केल्यास संगणकीय प्रणालीद्वारे अर्ज गाह्य ठरला जाणार नाही / Capture केला जाणार नाही याची अर्जदाराने विशेष दक्षता व नोंद घ्यावी. अर्जदारांच्या बँकेच्या शाखेचा MICR / IFSC क्रमांक टाईप केल्यानंतर सदर बँक व शाखेचे नाव आपोआप प्रदर्शित होत नसेल तर अर्जदाराने अन्य बँक खात्याची माहिती द्यावी अथवा स्वतःच्या बँकेशी संपर्क साधावा.

९) अर्जदाराने अर्जामध्ये त्याचा स्वतःचा PAN No. व विवाहित असल्यास आपल्या जोडीदाराचासुद्धा PAN No. देणे बंधनकारक आहे. सदर क्रमांक चुकीचा आढळल्यास अथवा दुसऱ्याचा पॅन कार्ड नंबर दिल्यास संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य ठरली जाणार नाही / Capture केली जाणार नाही.

१०) अर्जदाराने एकदा नोंदणी केल्यानंतर मोबाईल क्र. व OTP चा वापर करुन सदर अकाउंट Operate करता येईल. सर्व Communication हे E-Mail व SMS द्वारे करण्यात येणार असल्यामुळे E-Mail ID व Mobile No. भरताना काळजी घेणे तसेच सदर E-Mail ID व Mobile No. ताबा प्रक्रियेपर्यंत तोच ठेवणे आवश्यक आहे.

११) ऑनलाईन अर्ज करणे ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा/अंतिम दि.३१/०५ /२०२६ रात्री ११:५९ वा. पर्यंत राहील. या कालावधी व्यतिरिक्त कालावधीत कोणी अर्ज भरला असेल तर असा अर्ज सोडत प्रक्रियेमध्ये ग्राह्य धरला जाणार नाही, कृपया अधिक तपशीलाकरीता वेळापत्रक पहावे. त्यानंतर अर्जदाराने स्वत:ची माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. माहिती टाईप करताना चूक झाली असल्याचे अर्जदाराच्या निदर्शनास आल्यास, अर्जदाराने अगोदर भरलेला ऑनलाईन अर्ज Edit करून त्यामध्ये दुरुस्ती करता येते. अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशी दि.३१/०५/२०२६ रात्री ११:५९ वा. नंतर अर्जदाराला पूर्ण अर्ज भरण्याची अथवा भरलेल्या अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची संधी राहणार नाही. अर्जदारास त्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जामध्ये अर्ज शुल्क व अनामत रक्कमेचा भरणा करण्यापूर्वी बदल करता येईल. अनामत रक्कमेचा भरणा केल्यानंतर अर्ज फक्त पाहता येऊ शकेल. अर्जदाराने अनामत रक्कमेचा भरणा केल्यानंतर त्याचा ऑनलाईन अर्ज ओपन करुन त्यामध्ये कोणताही फेरफार करणे शक्य होणार नाही याची नोंद घ्यावी.

१२) अनामत रक्कमेच्या अदायगीसाठी Payment विवरणामध्ये योग्य पर्यायाची निवड करुन अनामत रक्कम व अर्ज फी भरण्याबाबतची प्रक्रिया पूर्ण करावी. अर्जदार Net Banking, Credit Card, Debit Card, UPI द्वारे Online Payment करु शकतात. अर्जासोबत ऑनलाईन पेमेंट दि.०१/०६/२०२६ रात्री ११:५९ वा. पर्यंत अनामत रक्कम व अर्ज फी भरणा करणे क्रमप्राप्त / बंधनकारक आहे, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

१३) ज्या अर्जदाराची यशस्वीरीत्या अनामत रक्कम व अर्ज फी भरणा विहित मुदतीत होईल तसेच ज्यांचे अर्ज संगणकीय प्रणाली द्वारे पात्र ठरतील असे अर्जदार/लाभार्थी सोडतीमध्ये सहभागाकरीता पात्र ठरतील.

१४) अर्जदारांनी अनामत रक्कम भरुन सादर केलेला अर्ज सोडतीपूर्वी कोणत्याही कारणास्तव मागे घेता येणार नाही व सोडतीपूर्वी अनामत रक्कम परत मिळणार नाही.

१५) **<u>अर्जदारास एकापेक्षा अधिक अर्ज करता येणार नाहीत. एकापेक्षा अधिक अर्ज केल्याचे आढळल्यास त्या अर्जदाराचे सर्व अर्ज कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील, याबाबत मा.मुख्याधिकारी, कु.ब.न.प. यांचा निर्णय अंतिम राहील.</u>**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
सकल जन हिताय

## सदनिकांच्या संगणकीकृत सोडतीची कार्यप्रणाली

१) जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या सर्व ऑनलाईन अर्जाची सोडतीकरिता पात्रता निश्चिती ही ALMS 1.0 या नवीन संगणकीय कार्यपणाली अंतर्गत करण्यात येईल. अर्ज विहित अनामत रक्कमेसह पूर्णपणे भरले आहेत की नाही हे तपासण्यात येईल. अपूर्ण आढळलेले अर्ज सोडतीपूर्वी रद्द केले जातील व त्याबाबत अर्जदाराकडून केलेल्या कोणत्याही निवेदनाचा विचार केला जाणार नाही. खालील प्रकारचे अर्ज आढळल्यास असे सर्व अर्ज सोडतीमधुन संगणकीय प्रणालीव्दारे आपोआप बाद ठरविले जातील.

- एकाच अर्जदाराचे एकापेक्षा जास्त अर्ज.
- वेगवेगळया अर्जदाराचे एकाच बँकेमध्ये एकच खाते क्रमांक.
- चुकीचा PAN क्रमांक नमुद केलेले अर्ज.
- विहित मुदतीमध्ये अनामत रक्कम व अर्ज शुल्क हे बँकेत जमा न झालेले अर्ज.
- ऑनलाईन अर्ज चालु होण्यापूर्वी व मुदत संपल्यानंतर केलेले अर्ज ऑनलाईन अर्ज चालु होण्याची व बंद होण्याची वेळ ही Server मध्ये असलेली वेळ ग्राह्य धरण्यात येईल.
- अर्जदाराचे व कुटुंबियांचे भारतामध्ये कुठेही पक्के घर असल्यास केलेला अर्ज
- अर्जदार व कुटुंबियांचे एकुण वार्षिक उत्पन्न रु.६,००,०००/- पेक्षा जास्त असल्यास केलेला अर्ज

२) सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांचे अर्ज क्रमांकांची निहाय प्रारूप यादी कु.ब.न.प.च्या https://www.kbmc.pmayhome.com/ या अधिकृत संकेतस्थळावर दि.१७/०६/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता प्रसिध्द करण्यात येईल. त्याबाबत अर्जदारांच्या तक्रारी असतील तर अशा अर्जदारांनी संकेतस्थळावर प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यापासून ते दि.२५/०६/२०२६ रोजी सायंकाळी ६:०० वा. पर्यंत या कार्यालयाकडे ऑनलाईन हरकती सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती कु.ब.न.प.च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तथापी अर्जदाराने अर्जामध्ये लिहिलेल्या माहिती मध्ये बदल केला जाणार नाही. सोडतीनंतर कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही. अशा प्रकारे आलेल्या हरकतींची छाननी करुन सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांची अंतिम यादी दि.०३/०७/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

ALMS 1.0 या संगणकीय प्रणाली सोडतीसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांची संगणकीय सोडत दि.०८/०७/२०२६ रोजी दुपारी १२:०० पासून कु.ब.न.प. कार्यालय येथे काढण्यात येणार आहे. सोडतीची जाहिरात वर्तमानपत्रात तसेच कु.ब.न.प.चे अधिकृत संकेतस्थळ https://kbmc.gov.in/ व https://www.kbmc.pmayhome.com/ वर प्रसिध्द करण्यात येईल. सोडतीच्या दिनांकाबाबत अर्जदारांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

३) संगणकीय सोडत काढताना अर्जदाराच्या अर्जाचा क्रमांक हाच लॉटरी जनरेशन क्रमांक म्हणून गृहित धरण्यात येईल. सोडतीच्या निकालात त्यांनी त्यांच्या अर्जाचा क्रमांक तपासावा. सोडतीत यशस्वी

झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांचे अर्जाचे क्रमांक कु.ब.न.प.च्या https://kbmc.gov.in/ व https://www.kbmc.pmayhome.com/ या संकेतस्थळावर तसेच कु.ब.न.प.च्या नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात येतील. संगणकीय सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना तात्पुरते देकारपत्र पत्राव्दारे स्वतंत्र्यरित्या कळविण्यात येईल.

४) ALMS 1.0 या संगणकीय प्रणालीद्वारे पात्र ठरलेल्या अर्जातून स्वतंत्रपणे जाहिर सोडत संगणकाद्वारे काढण्यात येईल. सदर सोडतीकरीता कु.ब.न.प. स्तरावर मा.मुख्याधिकारी, कु.ब.न.प. यांच्या मान्यतेने १००% (१:१) प्रतिक्षा यादी एकूण सदनिकांच्या संख्येच्या प्रमाणात ठेवण्यात आली आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

५) अर्जदाराने सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर त्याचे स्विकृती हि सिसटिम जनरेटेड असल्यामळे विहित मुदतीत स्विकृती कळविली नाही तर संगणकीय प्रणालीद्वारे संबंधित अर्जदाराचा अर्ज आपोआप / by default रद्द होईल व त्याची अनामत रक्कम परतावा त्यांनी दिलेल्या बँक खात्यामध्ये संगणकीय प्रणालीव्दारे आपोआप कार्यान्वित होईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्यामुळे यशस्वी अर्जदाराने स्विकृती पत्र विहित मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

६) सोडतीमध्ये अयशस्वी झालेल्या अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) ही अर्ज शुल्क वगळून (ऑनलाईन अर्जापोटी अदा केलेले-₹५००/- + जीएसटी @ १८%-₹९०/-) Electronic Clearing System (ECS) द्वारे अर्जदाराच्या बँक खात्यात अदा करण्यात येणार असल्यामुळे अर्जदाराने त्यांच्या अर्जात त्याच्या बँकेचे नाव, शाखेचे नाव व पत्ता, बँक खाते क्रमांक, एम.आय.सी.आर.(MICR) क्रमांक (९ अंकी) व आय.एफ.एस.सी. (IFSC) क्रमांक अचूकपणे नमूद करावा. ज्या अर्जदारांनी Debit / Credit Card द्वारे अनामत रक्कम जमा केली आहे, अशा अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम सुध्दा त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या बँक खात्यावरच परत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

७) अर्जदाराला सोडतीमध्ये अर्ज केल्यापासून सोडतीपर्यंतची माहिती त्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर, SMS व E-Mail द्वारे पाठविण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने अचूक मोबाईल क्रमांक व E-Mail ID द्यावा व सोडतीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू स्थितीत असावा. सदरचा मोबाईल क्रमांक व E-Mail ID बदलू नये. तसेच मोबाईल हरवल्यास अथवा मोबाईल क्रमांक बदलल्यास उद्भवण्यात येणाऱ्या पुढील अडचणीस कुळगाव बदलापूर नगरपरिषद जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

८) सदरच्या कालावधीत मोबाईल मध्ये **Do Not Disturb (DND)** हि सेवा कार्यरत नसल्याची अर्जदाराने दक्षता घ्यावी.

## सदनिकांची विक्री किंमत भरणा करावयाच्या अटी व शर्ती

१) योजनेतील प्रत्येक सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत निश्चित केलेली असून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व गृहनिर्माण विभाग, मंत्रालय यांना सदनिकेच्या विक्रीची किंमत व दर अंतिम करण्याचा वा त्यामध्ये वाढ करण्याचा तसेच सदनिकांच्या संख्येत वाढ वा घट करण्याचा अंतिम अधिकार राहील.

२) जाहिरातीत नमुद केलेली किंमत सदनिकेची अंदाजित विक्री किंमत असून लाभार्थ्यांना जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या सदनिकांच्या रक्कमे व्यतिरीक्त जीएसटी, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन चार्जेस, प्रॉपर्टी टॅक्स व देखभाल शुल्क, एम.एस.ई.बी. चार्जेस इ. शासकीय/ नगरपरिषदेकडील शुल्काचा भरणा करावा लागेल.

३) विक्री किंमतीचा पहीला हप्ता भरणा केल्यानंतर लाभार्थी अर्जदाराने मागणी केल्यास कोणत्याही वित्तिय संस्थेकडून कर्ज प्राप्त होण्यासाठी नगरपरिषदेचे "ना हरकत प्रमाण पत्र" देण्यात येईल. त्याकरिता अर्जदाराने "ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेसाठी Bank Sanction Letter अर्जाद्वारे नगरपरिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे.

४) सदनिकांचे देकारपत्र स्थानिक स्वराज्य संस्थेकडुन भोगवटा प्रमाणपत्र (OC-Occupation Certificate) प्राप्त झाल्यानंतरच पाठविण्यात येईल. भोगवटा प्रमाणपत्र मिळेपर्यंत अर्जदाराची फक्त अनामत रक्कम जमा राहील. तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास उशीर झाल्यास त्याला कुळगाव बदलापुर नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. जर नियोजित वेळेत ताबा देण्यास उशीर होत असल्यास नगरपरिषद मार्फत कार्यवाही करण्यात येईल व त्याबाबतचे वेळापत्रक कळविण्यात येईल.

५) कुळगाव बदलापुर नगरपरिषदे अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजने मधील यशस्वी अर्जदाराने/ लाभार्थ्यांने त्याची सदनिका ऑनलाईन स्विकृती विहित मुदतीत कळविल्यानंतर त्यास देकार पत्राची ऑनलाईन लिंक प्राप्त होईल सदर लिंक डाउनलोड करून त्यामध्ये नमूद टप्यानूसार विक्री किंमतीचा भरणा करणे क्रमप्राप्त आहे.

**कुळगाव बदलापुर नगरपरिषदे अंतर्गत विक्री करीता उपलब्ध करण्यात आलेल्या सदनिकांकरिता खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार विक्री किंमतीचा भरणा करावा लागेल**

| अ.क्र | भरावयाची रक्कम | मुदत |
|---|---|---|
| १ | सदनिकेच्या एकूण किंमतीच्या २५% रक्कम | कुळगाव बदलापुर नगरपरिषदेच्या सोडतीतील यशस्वी लाभार्थ्यांची पात्रता निश्चित झाल्यावर त्यास देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या देकार पत्रामध्ये (Provisional Offer Letter) ३० दिवसांत सदनिकेची २५% रक्कम प्रथम टप्प्यात, म्हणजेच देकारपत्राच्या दिनांकापासून एकूण ३० दिवसांत भरणा करण्यात यावी. |
| २ | उर्वरित ७५% रक्कम | सदनिकेची उर्वरित ७५% रक्कम दुसऱ्या टप्प्यात वरील नमूद ३० दिवसानंतर ६० दिवसाच्या कालावधीत, म्हणजेच देकार पत्राच्या दिनांकापासून एकूण ९० दिवसांत भरणा करण्यात यावी. |

६) ज्या अर्जदारांना १००% रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एक रकमी) भरावयाची आहे, असे अर्जदार बँकेमध्ये एक रक्कमी म्हणजेच १००% रक्कम देकारपत्राच्या दिनांकापासून एकूण ३० दिवसांत भरु शकतात व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त असल्यास त्यांना विहित वितरण प्रणाली अंतर्गत ताबा सुध्दा देण्याची कार्यवाही केली जाईल. सदर बाबत मा.मुख्याधिकारी, कु.ब.न.प यांचे निर्णय अंतिम राहतील.

७) यशस्वी व पात्र ठरलेला अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबा पत्र अर्जदार व त्याची पती/पत्नी या दोघांच्या संयुक्त नावे देण्याची कार्यवाही ही शासन नियमानुसार करणे नगरपरिषदेस क्रमप्राप्त आहे, याची कृपया यशस्वी लाभार्थ्याने नोंद घ्यावी.

८) यशस्वी लाभार्थींना गृहनिर्माण संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील.

९) सोडत प्रक्रीयेमध्ये अयशस्वी झालेल्या अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) ही अर्ज शुल्क वगळून (रु.५००/- + रु.९०/- (जीएसटी @ १८%)) हे ऑनलाईन पद्धतीने अर्जदाराच्या बँक खात्यात जमा करण्यात येतील.

१०) सदनिके पोटी भरावयाची प्रशासकिय शुल्क अथवा विक्री किंमत भरणा करण्यास यशस्वी अर्जदाराने कसूर केल्यास किंबहूना न भरल्यास त्यास देण्यात आलेले देकार पत्र रद्द करण्यात येऊन संबंधित अर्जदाराने भरणा केलेल्या रक्कमेतून सदनिकेच्या किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण (Forfeit) केली जाईल. उर्वरित रक्कम कोणतेही व्याज न देता अर्जदाराने संगणकिय सोडतीमध्ये नोंदविलेल्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल व त्याचा सदनिकेवरिल हक्क कायमस्वरूपी संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

११) यशस्वी लाभार्थ्यानी तात्पुरते देकार पत्र दिल्यानंतर माघार घेतल्यास विक्री किंमतीच्या १% रक्कम जप्त (Forfeit) करण्यात येऊन उर्वरित रक्कम परतावा करण्यात येईल. जप्त करण्यात येणारी रक्कम ही विक्री किंमतीच्या १% पेक्षा अधिक असल्यास भरणा केलेली संपुर्ण अनामत रक्कम समपहरण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१२) अर्जदार सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास अनामत रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून वजावट केली जाईल. तसेच विक्री किंमत भरणा केली असल्यास विक्री किंमतीच्या १% रक्कम वजावट केली जाईल. सादर केलेले कागदपत्रे बनावट आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करुन सदनिका रद्द केली जाईल/ताब्यात घेण्यात येईल व भरणा केलेली विक्री किंमत समपहरण (Forfeit) केली जाईल, याची नोंद घ्यावी.

१३) अर्जदार किंवा त्याचे पती/पत्नीने एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास व त्याचे एकापेक्षा जास्त अर्ज पात्र ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत त्यांनी सादर केलेल्या दुसऱ्या अर्जामधून त्यांना माघार घ्यावी लागेल. अशा प्रकारे माघार घेतलेल्या सर्व अर्जासाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विनाव्याज ₹१,०००/- इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून समपहरण (Forfeit) करुन उर्वरीत अनामत रक्कम परत करण्यात येईल.

१४) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मिळकत व्यवस्थापन विनियम १९८९ मधील तरतूदीनुसार सदनिकेची ५ वर्षांच्या कालावधीपर्यंत विक्री करता येणार नाही. सदनिकेची अधिकृत विक्री, हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास संबंधित सदनिका धारकाविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

१५) **समर्पित झालेल्या सदनिकांच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही :**

- अर्जदाराने देकारपत्र (Provisional Offer Letter) निर्गमित करण्यापुर्वी स्वेच्छेने सदनिका समर्पित केल्यास अनामत रक्कमेतून रु.१०००/- प्रशासकीय शुल्क वजा करुन उर्वरित रक्कम अर्जदाराच्या बँक खात्यात विना व्याज परतावा केली जाईल.
- देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव सदनिकेचे वितरण रद्द करण्यात आल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल.
- सद्यस्थितीत देकारपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने स्वेच्छेने सदनिका समर्पित केल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात येईल.
- याबाबत शासनाकडील वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार सदरचे शुल्क बाबत फेरबदल करण्याची मुभा कु.ब.न.प. कार्यालयास राहील. तसेच सदर प्रकरणी मा.मुख्याधिकारी, कु.ब.न.प. यांचा निर्णय अंतिम राहील.

## विशेष अटी व शर्ती

१. अर्जदार व अर्जदाराच्या कुटुंबाच्या नावे भारतात कुठेही पक्के घर नसावे.

२. अर्जदाराने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्र.३ AHP मध्ये यापुर्वी नोंदणी केलेली नसल्यास अर्जदारास प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) PMAY-MIS प्रणालीनुसार (https://pmaymis.gov.in/ ) अंतर्गत घटक क्र. ३ AHP मध्ये नोंदणी करणे अनिवार्य आहे.

३. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी अर्जदार कुटुंबामध्ये पती, पत्नी व अविवाहीत मुले यांचा समावेश असेल (विवाहीत अथवा अविवाहीत सज्ञान कमविती व्यक्ती हे स्वंतंत्र कुटुंब म्हणून ग्राहय धरण्यात येईल) तसेच सदनिकांसाठी कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील. जर अर्जदार व त्याची पती/पत्नी दोघेही पात्र झाले, तर त्याला/तिला कुठलीही एकच सदनिका अनुज्ञेय राहील.

४. पात्र लाभार्थ्यांना सदनिकांची विक्री किंमत बांधकामाच्या प्रगतीपथानुसार नगरपरिषदने निर्धारित केलेल्या हप्त्यानुसार भरावी लागणार आहे.

५. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मिळकत व्यवस्थापन विनियम १९८१ मधील तरतूदीनुसार सदनिकेची ५ वर्षांच्या कालावधीपर्यंत विक्री करता येणार नाही. सदनिकेची अधिकृत विक्री, हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास संबंधित सदनिका धारकाविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

६. अर्जदाराचे व त्याचे कुटुंब (पती व पत्नी) यांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.६,००,०००/- पर्यंतच असावे.

७. सदनिकेचा ताबा संबधित योजनेस नगरपरिषदेचे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर देण्यात येईल. भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास जास्त वेळ लागल्यास भरलेल्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही. तसेच सदनिकांसाठी पाणी पुरवठा हा म.जि.प्रा. कडून व विद्युत पुरवठा हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांसकडून केला जातो. सदनिकांचा ताबा देण्यापूर्वी पाणी पुरवठा मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. तथापि त्यास विलंब झाल्यास कुळगाव बदलापुर नगरपरिषद जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

८. यशस्वी व पात्र ठरलेला अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबा पत्र अर्जदार व त्याची पती/पत्नी या दोघांच्या संयुक्त नावे देण्याची कार्यवाही ही शासन नियमानुसार करणे नगरपरिषदेस क्रमप्राप्त आहे, याची कृपया यशस्वी लाभार्थ्याने नोंद घ्यावी.

९. नगरपरिषदेमार्फत आकारण्यात येणारे सर्व कर हे अर्जदारास भरणे बंधनकारक आहे तसेच, पाणीपट्टी, मल:निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थीस/सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्या त्या प्राधिकरणाकडे परस्पर भरावे लागतील.

१०. लाभार्थी सदनिका धारकांना त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण करुन ती पंजीकृत करुन घ्यावी लागेल. मंडळाची सर्व देय रक्कम अदा केल्यानंतर इमारती खालील व इमारती सभोवतीच्या अनुलग्न जमिनीचा भाडेपट्टा व इमारतीच्या मालकीचे अभिहस्तांतरण सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे करण्यात येईल. सदनिकांची किंवा इमारतीची दुरुस्ती सदनिका धारकांची किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेने स्वतः

करावयाची आहे. लाभार्थीना सहकारी गृहनिर्माण संस्था विहित कालावधीमध्ये स्थापन करण्याची कार्यवाही करावी लागेल. तसेच, गृहनिर्माण संस्था नोंदणी व इतर अनुषंगिक बाबींसाठी आकरण्यात येणारे शुल्क लाभार्थ्यांनी स्वत: भरावयाचे आहे.

११.वितरीत झालेल्या सदनिकेच्या विक्री किंमतीवर महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्काचा भरणा, संबंधित नोंदणी कार्यालय यांचेकडे तसेच सदनिकेचे आगाऊ वार्षिक सेवा शुल्क हे नगरपरिषदे अंतर्गत मिळकत विभाग यांचेकडे अदा करावे लागतील. तसेच शासनाच्या धोरणानुसार / अधिसूचनेनुसार मंडळाने विक्रीकरीता काढलेल्या सदनिकेस विक्री किंमती व्यतिरिक्त वस्तु व सेवा कर (Goods & Service Tax) लागू झाल्यास सदर कर संबंधित कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच सदनिकेचा ताबा दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

१२.कुळगाव बदलापूर नगर परिषदेने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा सोडत प्रक्रियेच्या कोणत्याही कामासाठी प्रतिनिधी /सल्लागार वा प्रॉपटी एजंट नेमलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला कुळगाव बदलापूर नगर परिषद जबाबदार राहणार नाही.

१३.या जाहिरातीमधील/माहिती पुस्तिकेत दिलेला तपशील परिपूर्ण नाही, तो फक्त निर्देशक आहे. जाहिरातीमध्ये/माहिती पुस्तिकेमध्ये अनावधानाने झालेल्या किंवा छपाईच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही.

१४.सदर सोडत प्रक्रिया ही कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ-म्हाडा यांचे आधारे/धर्तीवर राबविली जात असुन शासनाचे/नगरपरिषदेचे वेळोवेळी होणारे बदल हे अर्जदारास/लाभार्थ्यास लागू राहतील.

१५.या अटी शर्ती व्यतिरिक्त माहिती पुस्तिकेतील इतर अटी व शर्ती अर्जदारास/लाभार्थ्यास लागु असतील.

## Software बाबत माहिती

कुळगांव बदलापूर नगरपरिषद, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे. त्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे असणार आहे.

प्रथम आपण https://www.kbmc.pmayhome.com/ या संकेतस्थळावर जाऊन ॲप्लिकंट्स (अर्जदारांचे) लॉगिन करणार आहोत. त्यामुळे आपल्याला नवीन खाते (न्यू अकाउंट) तयार करायला लागेल. नवीन खाते तयार करण्यासाठी पुढील तपशील आपल्याला भरायचे आहेत: प्रथम आपण आपले संपूर्ण नाव टाकणार, त्यानंतर मोबाईल नंबर टाकणार आहोत. मोबाईल नंबर टाकल्यानंतर आपल्याला सोर्स (माहितीचा स्रोत) कुठून मिळाला आहे, त्यानंतर कॅप्चा टाकणार आहोत. त्याच्यानंतर आपल्याला आपल्या रजिस्टर मोबाईल नंबरवर ओटीपी येणार आहे. नंतर लॉगिन करून तुम्ही अर्ज भरू शकता. दिलेल्या प्रश्नावलीतील योग्य पर्याय निवडा आणि पुढे जाण्यासाठी कंटिन्यू बटणावर क्लिक करा.

**पडताळणी प्रक्रिया :**

**आधार पडताळणी**: आपला आधार क्रमांक प्रविष्ट करा आणि व्हेरिफाय बटणावर क्लिक करा. स्टार्ट व्हेरिफिकेशन वर क्लिक करा.

**डिजी लॉकर पडताळणी:** आणि पुन्हा एकदा आपला आधार क्रमांक टाकून नेक्स्ट बटणावर क्लिक करा. तुमच्या नोंदणीकृत (रजिस्टर) मोबाईल क्रमांकावर आलेला ओटीपी प्रविष्ट करा आणि सबमिट करा. आपल्या डिजी लॉकरचा पिन प्रविष्ट करून डन बटणावर क्लिक करा. त्यानंतर आधार पर्याय निवडून अलाऊ बटणावर क्लिक करा आणि प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रतीक्षा करा.

**पॅन पडताळणी:** वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यावर आपला पॅन क्रमांक (पॅन नंबर) प्रविष्ट करून पॅन पडताळणी करून घ्या.

**अर्ज सादर करणे :**

दोन्ही पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तुम्ही तुमची स्कीम ॲप्लिकेशन भरण्यास सुरुवात करू शकता.

योजनेचा अर्ज भरण्याची प्रक्रिया : अर्ज भरण्यासाठी खालील टप्प्यांचे पालन करावे लागते.

अर्ज आणि वॉर्ड तपशील : ओळख पडताळणी (Verify Identity) झाल्यावर, योजना अर्ज फॉर्म (Scheme Application Form) उघडला जातो. यामध्ये प्रथम वॉर्डचे नाव (Ward Name) टाकणे आवश्यक आहे. योजना आणि टॉवरचे तपशील आपोआप दिसतात.

अर्जदाराची माहिती (Applicant Details) : अर्जदाराचे पूर्ण नाव, वडिलांचे किंवा पतीचे/पत्नीचे नाव टाकावे. वय, लिंग आणि वैवाहिक स्थिती अपडेट करणे. अर्जदार दिव्यांग (डिसेबल्ड) किंवा अनाथ (Orphan) आहे का, याची माहिती आणि मोबाईल नंबर टाकणे.

पत्ता (Address) : या ठिकाणी अर्जदाराचा सध्याचा आणि कायमचा पत्ता टाकला जातो. त्यानंतर मालकी हक्काचे तपशील (Ownership) भरावे.

ओळख आणि बँक तपशील: आधार कार्ड क्रमांक आणि इतर ओळखपत्रांचे प्रकार निवडून त्यांचे क्रमांक टाकावे.

कुटुंब आणि इतर माहिती : कुटुंबातील सदस्यांची नावे, नाते, लिंग, वय आणि आधार क्रमांक अपडेट करा. अर्जदाराचा धर्म (Religion) आणि जात (Caste) टाकावी.

बँक तपशीलामध्ये खाते क्रमांक आणि आयएफएससी (IFSC) कोड टाकून गेट बँक डिटेल्सवर क्लिक केल्यास बँक आणि शाखेचे नाव आपोआप येते. रहिवासी माहिती आणि व्यवसायाचे (Occupation) तपशील भरावे.

फोटो आणि स्वाक्षरी : अर्जदाराचा अद्ययावत फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करून डेटा सेव्ह करावा. शेवटी सर्व माहिती तपासून अर्ज सबमिट करावा. जर अर्ज रद्द करायचा असेल, तर कॅन्सल ॲप्लिकेशन या पर्यायाचा वापर करता येतो.

**स्कीम अर्ज प्रक्रिया आणि सूचना अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी खालील पायऱ्यांचे पालन करा.**

१. **अर्ज सबमिशन आणि कागदपत्रे :**
   अर्ज सबमिशन: स्कीम ॲप्लिकेशन फॉर्म यशस्वीरित्या सबमिट केल्यानंतर तुम्हाला आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील.
   कागदपत्रांची आवश्यकता: अर्जदार दिव्यांग असल्यास दिव्यांगत्व प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. तथापि, यादीत नमूद केलेली इतर सर्व कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे.

२. **पेमेंट प्रक्रिया :**
   पेमेंट सक्रिय करणे : सर्व कागदपत्रे योग्यरित्या अपलोड झाल्यानंतर तुम्हाला पेमेंटचा पर्याय सक्रिय (Enable) झालेला दिसेल.
   पेमेंट पूर्ण करणे: तुम्ही उपलब्ध असलेल्या विविध पेमेंट पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पेमेंट प्रक्रिया पूर्ण करू शकता. पेमेंट यशस्वी झाल्यावर तुम्हाला रिसिट जनरेट करण्याचा पर्याय मिळेल. रिसिट जनरेट केल्यावर तुमचे पेमेंट ट्रान्झॅक्शन स्क्रीनवर दिसून येईल.

   पेमेंट पूर्ण झाल्यानंतर पालिकेच्या टीमद्वारे अर्जाची ऑनलाईन पडताळणी (व्हेरिफिकेशन) केली जाईल, ज्यामध्ये आपण अपलोड केलेली सर्व कागदपत्रे तपासली जातील. कागदपत्रे योग्य असल्यास प्रत्यक्ष पडताळणीसाठी आपल्याला संदेश (SMS) द्वारे कळवले जाईल. कृपया संदेशात नमूद केलेल्या दिनांक आणि वेळेनुसार कु.ब.न.प. कार्यालयात उपस्थित राहावे. प्रत्यक्ष पडताळणीसाठी येताना सर्व मूळ कागदपत्रे (Original Documents) सोबत आणणे अनिवार्य आहे.

# विशेष सूचना

सदनिकेचा ताबा संबंधित योजनेस नगरपरिषदेचे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्या नंतरच देण्यात येईल. भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास जास्त वेळ लागल्यास भरलेल्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही याची अर्जदारांनी कृपया नोंद घ्यावी. तसेच सदनिकांसाठी पाणी पुरवठा म.जी.प्रा. कडून केला जातो. सदनिकांचा ताबा देण्यापूर्वी पाणी पुरवठा मिळवून देण्यासाठी सर्वतोवरी प्रयत्न केले जातील. तथापी त्यास विलंब झाल्यास म्हाडा जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

उत्पन्नाचा दाखला हा अर्जदाराच्या नावे असणे बंधनकारक आहे.

यशस्वी झालेल्या अर्जदारांनी अनामत रक्कमेचा परतावा मागितल्यास अर्जासोबत भरलेल्या रक्कमेतून १% रक्कम कपात करण्यात येईल.

मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडील दि.०४/०२/२०२६ रोजीचे स्वाक्षरी नुसार आरक्षण विषयक परिपत्रकाचे अनुपालन करून कुठल्याही प्रकारचे सामाजिक/जात/प्रवर्ग निहाय आरक्षण न ठेवता सर्वसाधारण प्रवर्गा (General Public) करिता खुले ठेवणे नियोजित आहे.

या माहिती पुस्तकेत दिलेला तपशिल फक्त निदर्शक आहे. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थींना वेळोवेळी नगरपरिषदेद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल ) विनियम १९८१ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास म्हाडा अधिनियम मधील तरतूदी, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अधिसूचना तसेच शासनामार्फत वेळोवेळी लागू होणारे धोरण अंतर्गत नियमांच्या अधिन राहून विक्री करणे बंधनकारक राहिल तसेच (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ च्या तरतुदी मध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

यशस्वी व पात्र ठरलेल्या अर्जदारांच्या कागदपत्रांची फेर तपासणी करण्याचे अधिकार नगरपरिषदेस असुन त्यामध्ये कोणत्याही स्तरावर काही त्रुटी आढळल्यास अशा अर्जदारांचे वितरण कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येईल. त्यावर अर्जदारास पंधरा दिवसाच्या आत मा. मुख्याधिकारी, कुळगाव बदलापुर नगरपरिषद यांचेकडे अपिल करता येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहिल.

शासनाच्या सुधारीत धोरणानुसार सदनिकेच्या किंमतीवर लागणारा सेवा कर अथवा भविष्यात लागू होणारे इतर अनुषंगिक कर सदनिकाधारकांना भरावे लागतील.

मुख्याधिकारी
कुळगाव बदलापुर नगरपरिषद, कुळगाव

# संपर्क

**पत्ता (Address):**

कुळगाव बदलापूर नगरपरिषद, नवीन प्रशासकीय इमारत, बांधकाम विभाग, PMAY कक्ष, तिसरा मजला, म.गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगाव बदलापूर – ४२१५०३ ता.अंबरनाथ, जि.ठाणे

**Email:**

pmaykbmclottery@gmail.com

**Phone:**

+91 8108102797

कुळगांव बदलापूर नगरपरिषद

म्हाडा MHADA

प्रधान मंत्री आवास योजना-शहरी



# सावधानतेचा इशारा.

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद अंतर्गत
## प्रधानमंत्री आवास घटक क्र. ३.
## परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (AHP)

**योजनेतील सदनिकांच्या सोडतीसाठी, वितरणासाठी किंवा  याबाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी / सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही.**

अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर आर्थिक व्यवहार केल्यास त्याला कुळगांव बदलापूर नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.

तसेच अर्जदारास कोणी दलाल / व्यक्ती परस्पर अर्ज विक्री किंवा कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या नावे आर्थिक फसवणूक करणे इ. बाबी करताना आढळल्यास कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

**-: अधिक माहितीसाठी संपर्क :-**

कुळगांव बदलापूर नगरपरिषद, नविन प्रशासकीय इमारत,
महात्मा गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पू.).

**-: हेल्पलाईन क्रमांक :-**

**८१० ८१० २७९७**



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद ऑनलाईन अर्जकरिता संकेतस्थळ**

www.kbmc.gov.in | www.kbmc.pmayhome.com